प्रबोधन
गोरेगाव

# सोळावा वार्षिक अहवाल

## १९८७-८८-८९

# प्रबोधन गोरेगाव

## १५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा

प्रबोधन गोरेगाव या संस्थेची १५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दिनांक ५ मार्च १९८८ रोजी रात्री ९ वाजता गणपती भुवन, महात्मा गांधी मार्ग, गोरेगाव (प.), मुंबई-६२ येथील संस्था कार्यालयात आयोजित करण्यात आली आहे. या सभेस सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे ही विनंती.

**सभेपुढील कामकाज :**

१. प्रास्ताविक

२. सन १९८६-८७ चा वार्षिक अहवाल, आयव्यय पत्रक व ताळेबंद (हिशेब तपासनीसांच्या अहवालासह) वाचून मंजूर करणे.

३. नवीन वर्षाकरिता (१९८७-८८) घटनेच्या कलम ७ इ प्रमाणे अध्यक्ष (१ जागा) उपाध्यक्ष (२ जागा) व कार्यकारी मंडळावरील निवृत्त झालेल्या ३ सभासदांच्या जागी नवीन सभासदांची निवड करणे. (एकूण ६ जागा)

४. नवीन वर्षाकरिता अंतर्गत हिशेब तपासनीस व सरकारमान्य हिशब तपासनीस यांची नेमणूक करणे.

५. अध्यक्षांचे अनुमतीने सभेपुढे येणारी कामे.

कार्यकारी मंडळाच्या आज्ञेवरुन

**गिरीश देसाई**
कार्याध्यक्ष

गोरेगाव, मुंबई-६२

**डॉ. मनोहर अद्वानकर**
प्रमुख कार्यवाह

---

१) संस्थेचा जमाखर्च सभासदांच्या अवलोकनार्थ गणपती भुवन, लो. टिळक नगर रस्ता क्र. ३, गोरेगाव (प) येथील संस्थेच्या कार्यालयात दि. १-३-१९८८ व २-३-१९८८ पर्यंत रोज रात्री ८ ते ९ पर्यंत ठेवण्यात येईल.

२) कोणाही सभासदास त्या बाबतीत काही सूचना करावयाच्या असल्यास त्या दिनांक ३-३-१९८८ पूर्वी कार्याध्यक्षांकडे लेखी सादर कराव्यात.

३) गणसंख्येच्या अभावी वरील सभा तहकूब झाल्यास, तहकूब झालेली सभा त्याच ठिकाणी अर्ध्या तासनंतर घेण्यात येईल व अशा सभेस गणसंख्येची आवश्यकता राहणार नाही.

४) निवडणूकीस उभे राहू इच्छिणाऱ्या सभासदांनी आपले अर्ज दि. ३-३-१९८८ पूर्वी संस्था कार्यालयात रात्री ८ ते ९ या वेळेत आणून द्यावेत. अर्जांचा नमूना याच ठिकाणी उपलब्ध आहे.

# 'प्रबोधन', गोरेगाव

## १६ वा वार्षिक अहवाल

## १९८७–१९८८–१९८९

'प्रबोधन–गोरेगाव' या संस्थेच्या कार्याचा दि. १ जुलै १९८७ ते ३१ मार्च १९८९ पर्यंतच्या सोळाव्या वर्षाचा अहवाल व संस्थेची हिशेब पत्रके संस्थेच्या सर्व सन्माननीय सभासदांना सादर करताना कार्यकारी मंडळास आनंद होत आहे.

## कार्यकारी मंडळ आणि सभा :

या अहवाल वर्षात कार्यकारी मंडळाच्या एकूण १९ सभा घेण्यात आल्या. या सभांना सरासरी १२ उपस्थिती होती. या अहवाल वर्षी कार्यकारी मंडळाची एकूण सभासद संख्या स्वीकृत सभासदांसह १८ होती.

## प्रबोधन वक्तृत्व स्पर्धा (वर्ष १५वे)

शालेय त्याचप्रमाणे महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगती व उत्कर्षासाठी सतत जागरूक असणाऱ्या संस्थेने, त्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देण्याच्या उद्देशाने स्थापनेपासूनच वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यास सुरुवात केली. सातत्याने यंदाच्या १५व्या वर्षीच्या वक्तृत्व स्पर्धेस पुणे, नसिक इ ठिकाणच्या विद्यार्थ्यांचा सहभाग लाभला. यंदाच्या स्पर्धेचे वैशिष्ट्य म्हणजे, या स्पर्धा 'कथाकथना' च्या स्पर्धा होत्या. त्या स्पर्धेसाठीसुध्दा विद्यार्थ्यांचा सहभाग फार मोठ्या प्रमाणावर लाभला. अखिल महाराष्ट्र पातळीवरील या स्पर्धा रविवार दि. २० सप्टेंबर, १९८७ रोजी पाटकर महाविद्यालय, स्वा. वि. मार्ग, गोरेगाव (पश्चिम) मुंबई–६२ येथे पालक, शिक्षक, विद्यार्थी व इतर हितचिंतकांच्या उपस्थितीत अत्यंत शिस्तबध्द वातावरणात पार पडल्या.

या स्पर्धेचा बक्षिस समारंभ त्याच दिवशी पाटकर महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. आंबेडेकर यांच्या शुभहस्ते झाला. त्याप्रसंगी विजेत्या स्पर्धकांना रोख बक्षिसे व प्रमाणपत्रे देण्यात आली तर विजेत्या संघाना फिरता करंडक देण्यात आला. या स्पर्धेच्या शालेय गटाचे परीक्षण सौ. शैलजा त्रैलोक्य व कु. शुभांगी जोगळेकर यांनी तर महाविद्यालयीन गटाचे परीक्षण श्रीमती स्नेहल कुलकर्णी व श्री अरविंद वैद्य यांनी केले.

स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे :

**शालेय गट :**

## शिक्षण महर्षी कै. दादासाहेब रेगे स्मृति प्रबोधन फिरता चषक :

सांघिक विजेती शाळा : अ. भि. गोरेगावकर इंग्लिश स्कूल, गोरेगाव
स्पर्धक विद्यार्थी : कु. अरुणा राणे व मंगेश केळकर.

## कथाकथन स्पर्धा

प्रथम पारितोषिक : (रोख रु. १५०/–)
कु. अरुणा राणे, अ. भि. गोरेगावकर इंग्लिश स्कूल, गोरेगाव. द्वितीय पारितोषिक : (रोख रु. १००/–)
कु. सोनाली साठे, चिकित्सक समूह शिरोळकर हायस्कूल, गिरगांव.
तृतीय पारितोषिक : (रोख रु. ५०/–)
कु. मंजिरी नातू, वामनराव मुरांजन माध्यमिक विद्यालय, मुलुंड

## उत्स्फूर्त भाषण स्पर्धा

प्रथम पारितोषिक : (रोख रु. ५०/–)
मंगेश केळकर, अ. भि. गोरेगावकर इंग्लिश स्कूल
द्वितीय पारितोषिक : (रोख रु. २५/–)
भूषण राणे, आदर्श विद्यालय, गोरेगाव.

**महाविद्यालयीन गट :**

**कै. जगदिश गोविंदराव कुलकर्णी स्मृति–प्रबोधन फिरता चषक :**

सांघिक विजेते महाविद्यालय : मॉडर्न महाविद्यालय शिवाजीनगर, पुणे.

स्पर्धक विद्यार्थी : परेश मोकाशी व किशोर ढमाले

## कथाकथन स्पर्धा –

प्रथम पारितोषिक (रोख रु. २००/–)

परेश मोकाशी, मॉडर्न महाविद्यालय, शिवाजीनगर पुणे

द्वितीय पारितोषिक (रोख रु. १५०/–) (विभागून)

मनीष मोहिले, रा. आ. पोदार महाविद्यालय, माटुंगा, व अनिता देशपांडे, मुलुंड कॉलेज ऑफ कॉमर्स, मुलुंड

तृतीय पारितोषिक (रोख रु. १००/–)

हर्षदा कुलकर्णी, नरसी मोनजी महाविद्यालय, विलेपार्ले

## उत्स्फूर्त भाषण स्पर्धा–

प्रथम पारितोषिक (रोख रु. १००/–)

किशोर ढमाले, मॉडर्न महाविद्यालय, शिवाजी नगर, पुणे

द्वितीय पारितोषिक (रोख रु. ७५–)

प्रशांत जोशी, रा. आ. पोदार महाविद्यालय, माटुंगा

## प्रबोधन आंतर शालेय क्रीडा महोत्सव– वर्ष १०वे

बांद्रे ते दहिसर या पश्चिम उपनगरातील शालेय विद्यार्थ्यांसाठी संस्थेने क्रीडा महोत्सवाचे आयोजन करून या पश्चिम उपनगरांतील विद्यार्थ्यांसाठी त्यांचे उपजत क्रीडागुण प्रगट करण्याची फार मोठी संधी उपलब्ध करून दिली आहे. यंदाचा दहावा क्रीडामहोत्सव सिध्दार्थ नगर क्रीडांगण, गोरेगाव (पश्चिम) येथे आयोजित करण्यात आला. या क्रीडा महोत्सवास पश्चिम उपनगरातील ६९ शाळांतील ३००० हून अधिक खेळाडूंनी भाग घेतला होता.

जरी या क्रीडा महोत्सवात ६९ शाळांतील ३००० हून अधिक खेळाडूंनी भाग घेतला असला तरी हे विद्यार्थी पश्चिम उपनगरांतील, खेळांच्या सर्व सुविधांपासून वंचित अशा ३ लाखाहूनही अधिक विद्यार्थ्यांचे प्रतिनिधित्व करतात. ही जाणीव 'प्रबोधन' ला असल्याकारणानेच क्रीडा महोत्सवाच्या आयोजनापासूनच 'प्रबोधन' ने विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन देणाऱ्या, सराव केंद्राचे व क्रीडासंकुल उभारण्याचे स्वप्न उरी बाळगले व सिध्दार्थ नगर पटांगणावर क्रीडासंकुल उभारण्याची घोषणा केली. तो स्वप्नपूर्तीचा दिवस आता फार दूर नाही, हे याठिकाणी मुद्दामच नमूद केले पाहिजे.

यंदाचा १०वा क्रीडा महोत्सव १८ ते २० डिसेंबर १९८७ च्या दरम्यान, सिध्दार्थनगर पटांगण, गोरेगाव (पश्चिम) येथे अत्यंत शिस्तबध्द वातावरणात पार पडला. दि. १८ डिसेंबर १९८७ रोजी या क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन बृहनमुंबई महानगर पालिकेचे माननीय आयुक्त श्री. सदाशिवराव तिनईकर यांचे शुभहस्ते झाले. आपल्या उद्घाटनपर भाषणात त्यांनी 'येत्या एक दोन वर्षातच सिध्दार्थ नगर पटांगणाचे स्वरूप आपणांस पालटलेले दिसेल व 'प्रबोधन' च्या क्रीडासंकुलास महानगरपालिकेचे सक्रीय सहाय्य लाभेल' असे जाहीर आश्वासन देऊन त्यांनी 'प्रबोधनचा, क्रीडामहोत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी राबणाऱ्या असंख्य कार्यकर्त्यांचा त्याचप्रमाणे असंख्य क्रीडाप्रेमी क्रीडपटुंचा उत्साह द्विगुणित केला आहे. माननीय आयुक्तांच्या जाहीर आश्वासनामुळेच क्रीडासंकुल उभारणीचा दिवस आता फार दूर नाही याची जाणीव क्रीडाप्रेमींना झाली आहे असे म्हणणे वावगे ठरू नये.

उद्घाटनाच्या दिवशी पाहुण्यांनी विद्यार्थ्यांची मानवंदना स्वीकारली. 'जम्बो सर्कस' च्या 'अप्पू' या हत्तीने पाहुण्यांस दिलेली मानवंदना, हे उद्घाटन सोहळ्याचे आकर्षण ठरले.

कुमार फजलुर रेहमान, या गतवर्षीच्या सर्वोत्कृष्ट ठरलेल्या, एअर पोर्ट हायस्कूल, विलेपार्ले, या शाळेच्या विद्यार्थ्याने क्रीडाज्योत प्रज्वलित केली तर

प्रबोधनचा क्रीडाध्वज 'प्रबोधन' चे अध्यक्ष, **आमदार श्री. भाई सावंत** यानी फडकविला. **श्री वायरन बॅप्ट** यांनी क्रीडापटुंना शपथ दिली तर कार्यक्रमाचे सूत्रचालन **डॉ. मनोहर अद्वानकर**, 'प्रबोधन' चे प्रमुख कार्यवाह यांनी केले. तीन दिवस सतत चाललेल्या या क्रीडामहोत्सवात विद्यार्थ्यांनी ३५ प्रकारच्या विविध क्रीडाप्रकारात आपले प्राविण्य दाखविले कबड्डीमध्ये ५१ शाळांच्या तर खो-खो मध्ये ४७ शाळांच्या संघांनी भाग घेतला होता. सांघिक कवायतीत १५ तर लोकनृत्य स्पर्धेत शाळांच्या संघांनी भाग घेतला होता. प्रेक्षक सज्जांत उपस्थित असणाऱ्या हजारो विद्यार्थी, शिक्षक व क्रीडाप्रेमींच्या उपस्थितीमुळे या महोत्सवास खरेखुरे महोत्सवी स्वरूप प्राप्त झाले होते. सेवाभावी कार्यकर्त्यांचा संच हे तर संस्थेचे शक्तिस्थानच त्या कार्यकर्त्यांमुळेच हा क्रीडाहोत्सव अत्यत शिस्तबध्द वातावणात पार पाडला प्रतिवर्षा प्रमाणेच यंदाही क्रीडामहर्षी **श्री. यशवंतराव गोले** यांचे मार्गदर्शन क्रीडामहोत्सवास लाभले.

दि. २० डिसेंबर, १९८७ रोजी स्थानिक नगरसेवक **श्री. सुहास सामंत** यांनी महोत्सवाची सांगता झाल्याचे घोषित केले. त्याप्रसंगी त्यांनी खेळडूंची मानवंदना स्वीकारली. 'प्रबोधन' चा क्रीडाध्वज अत्यंत सन्मानाने उतरविण्यात आला. त्याप्रसंगी **श्री मुरारराव राणे**, नगरसेवक **श्री विलास अवचट** इत्यादी मान्यवर उपस्थित होते सांगता समारंभानंतर मैदानातन प्रकाशझोतात झालेल्या लोकनृत्याच्या स्पर्धांनी समारंभास खरोखुरी रंगत आणली. त्यानंतर बक्षिस समारंभ मुंबईचे महापौर व आमदार **डॉ. रमेश प्रभू** यांचे हस्ते पार पडला. त्याप्रसंगी विजेत्या शाळांच्या संघाना करंडक देण्यात आले

स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे :
सर्वोत्कृष्ट संघासाठी असलेला प्रबोधन फिरता करंडक

**सेन्ट थॉमस हायस्कूल, गोरेगाव (पूर्व)**

**कबड्डी (मुले) :**
विजेता संघ : **चोगले हायस्कूल, बोरीवली**
उपविजेता संघ : **श्री समर्थ विद्यालय, जोगेश्वरी**

**कबड्डी (मुली) :**
विजेता संघ : **उत्कर्ष मंदिर, मालाड**
उपविजेता संघ : **महात्मा गांधी विद्यामंदिर, बांद्रे**

**खो-खो - (मुले) :**
विजेता संघ : **नंदादीप हायस्कूल, गोरेगाव**
उपविजेता संघ : **विद्यामंदिर, दहिसर**

**खो-खो-(मुली) :**
विजेता संघ : **परांजपे विद्यालय, अंधेरी**
उपविजेता संघ : **आय. ई. एस इंग्लिश स्कूल बांद्रे**

**ॲथलेटिक्स स्पर्धा :**
विजेता संघ : **सेंट ॲनिज स्कूल, बोरीवली**
उपविजेता संघ: **सेन्ट थॉमस हायस्कूल, गोरेगाव**

**संचलन स्पर्धा :**
विजेता संघ : **सेन्ट थॉमस हायस्कूल, गोरेगाव**
उपविजेता संघ : **विद्यामंदिर, दहिसर**

**लोकनृत्य स्पर्धा :**
विजेता संघ :
**विद्याविकास मंडळ विद्यालय, अंधेरी**
उपविजेता संघ : **श्रीमती जयाबेन खोत हायस्कूल, बोरीवली**

## शालांत परीक्षा व्याख्यानमाला –

## (वर्ष १६वे)

इयत्ता १०वी च्या विद्यार्थ्यांसाठी संस्था प्रतिवर्षी व्याख्यानमाला आयोजित करीत असते. या व्याख्यान मालेत प्रत्येक विषयातील तज्ञ शिक्षकांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना लाभते. यंदाच्या वर्षीची व्याख्यानमाला दि. ८ ते १६ फेब्रुवारी १९८८ च्या दरम्यान नंदा–

दीप विद्यालय, गोरेगाव (पूर्व) या शाळेच्या पटांगणांत अत्यंत शिस्तबध्द वातावरणात पार पडली. या व्याख्यानमालेचा लाभ गोरेगावातील हजारो विद्यार्थ्यांनी घेतला.

## 'चित्रमय जपान' प्रदर्शन

जपानच्या सामाजिक व सांस्कृतिकत्या चप्रमाणे तांत्रिक प्रगतीचा वेध घेणारे असे 'चित्रमय जपान' हे आगळे-वेगळे प्रदर्शन दि. २० ते २८ फेब्रु. १९८८ च्या दरम्यान पाटकर महाविद्यालयाच्या सभागृहात आयोजित करण्यात आले होते. या प्रदर्शनांत उत्तमोत्तम अशा ७५ छायाचित्रांचे प्रदर्शन मांडण्यात आले होते व त्या छायाचित्रांद्वारे जपानची सर्वांगीण प्रगती चित्रित करण्यात आली होती. या प्रदर्शनाचे उद्घाटन मुंबईचे महापौर व आमदार डॉ रमेश प्रभू यांचे शुभहस्ते दि. २० फेब्रवारी १९८८ रोजी झाले. त्याप्रसंगी जपानी दूतावास मुंबई यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. या प्रदर्शनाचा लाभ हजारो नागरिकांनी घेतला व जपानच्या विविध अंगानी झालेल्या प्रगतीची माहिती करून घेतली

## सोळावा वर्धापन दिन

संस्थेचा यंदाचा सोळावा वर्धापनदिन, गुढीपाडव्या च्या आदल्या दिवशी दि. १७ मार्च १९८८ रोजी पाटकर महाविद्यालयाच्या पटांगणावर मोठ्या थाटात पार पडला. या प्रसंगी 'सिंफोनी' प्रस्तुत मंगलगाणी दंगल गाणी हा मराठमोळ्या गीतांचा अत्यत सूत्रबध्द असा कार्यक्रम सादर करण्यात आला या कार्यक्रमांत गायक कलाकारांनी, गेल्या ५० वर्षांत मराठी गाण्याचे स्वरूप कसेकसे पालटत गेले, हे अनेक गाजलेली मराठी गाणी व कविता साभिनय सादर करून प्रेक्षकांना मंत्रमुग्ध करून सोडले

या वर्धापनदिन सोहळयाच्या प्रसंगी समारंभाचे अध्यक्षस्थान प्रा. डॉ. सदा कऱ्हाडे यांनी भूषविले होते. त्याचप्रमाणे गोरेगावातील मराठी माध्यमांच्या शाळांतून सर्वप्रथम आलेल्या, त्यांचप्रमाणे विविध विषयांत सर्वप्रथम आलेल्या गुणी विद्यार्थ्यांचा सत्कार नगरसेवक **श्री. सुहास सामंत** यांचे हस्ते करण्यात आला.

## योगाभ्यास वर्ग

मुंबईसारख्या शहरांत अत्यंत धकाधकीच्या जीवनांत व प्रदूषणग्रस्त वातावरणात आपले आरोग्य व्यवस्थित राखणे ही एक तारेवरची कसरत आहे. अशा परिस्थितीत लोकांना योगाभ्यासाचे महत्व पटू लागले आहे. श्री. सदाशिव निंबाळकर यांच्यासारख्या योगाभ्यासातील तज्ञाचे मार्गदर्शन गोरेगावातील रहिवाश्यांना लाभावे यादृष्टीने १ मे ते ५जून १९८८ या दरम्यान, पाटकर महाविद्यालयाच्या सभागृहात श्री. सदाशिव निंबाळकर यांच्या तज्ञ मार्गदर्शनाखाली योगाभ्यास वर्ग आयोजित करण्यात आले होते. या वर्गांचा लाभ अनेक अबालवृध्द व तरूणानी घेतला.

## प्रबोधन बालवाचनालय –

संस्थेच्या रचनात्मक कार्याचा एक भाग म्हणून संस्थेतर्फे चालविण्यात येणाऱ्या बालवाचनालयात उत्तमोत्तम व संस्कारक्षम अशा ३०००हून अधिक पुस्तकांचा समावेश आहे. दूरदर्शनच्या वाढत्या प्रसार व प्रभावामुळे शालेय विद्यार्थ्यांची वाचनाची आवड सध्या कमी झाली आहे, असे आम्हांस प्रामाणिकपणे वाटते. अशापरिस्थितीत विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड वाढीस लागावी यासाठी शिक्षक व पालक यांनी सर्वतोपरी प्रयत्न करणे आवश्यक आहे अशा प्रयत्नानेच संस्थेतर्फे विनामूल्य चालविण्यात येणाऱ्या बालवाचनालयाचा लाभ घेणाऱ्या शालेय विद्यार्थ्यांची संख्या वाढती राहील, असा विश्वास संस्थेस वाटतो.

## प्रबोधन बालवाडी –

संस्थेच्या रचनात्मक कार्याचाभाग असलेल्या व समाजातील आर्थिकदृष्ट्या मागास असणाऱ्या घटकांना

– वर्ष ११ वे

वांद्रे ते दहिसर या पश्चिम उपनगरांतील शालेय खेळाडूंसाठी, त्यांच्या अंगचे उपजत क्रीडागुण प्रगट करण्याची संधी देणाऱ्या अशा क्रीडा महोत्सवाचे सातत्याने अकराव्या वर्षी आयोजन करून संस्थेने क्रीडा क्षेत्रांत स्वतःचा ठसा उमटविला आहे. हे नमूद करण्यात आम्हास अत्यानंद होत आहे. अकराव्या वर्षीच्या या क्रीडामहोत्सवांत वांद्रे ते दहिसर या पश्चिम उपनगरांतील ६१ माध्यमिक शाळांतील २००० पेक्षा अधिक खेळाडूंनी भाग घेतला होता हा क्रीडामहोत्सव दि. १६ ते १८ डिसेंबरच्या दरम्यान सिध्दार्थ नगर पटांगण, गोरेगाव (पश्चिम) या ठिकाणी संपन्न झाला. दिनांक १६ डिसेंबर १९८८ रोजी या स्पर्धेचा उद्‌घाटन सोहळा श्री. काळे, मुंबई महानगरपालिका अधिकारी यांचे शुभहस्ते करण्यात आला तर सांगता समारंभ दि. १८ डिसेंबर १९८८ रोजी करण्यात आला त्याप्रसंगी रिलायन्स उद्योग समूहाचे श्री. पै. यांचे शुभहस्ते विजेत्या स्पर्धक शाळांना चषक प्रदान करण्यात आले. स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे :

सर्वोत्कृष्ट संघासाठी असलेला 'प्रबोधन फिरता करंडक

**महात्मा गांधी विद्यामंदिर, वांद्रे**

**कबड्डी (मुले)**

विजेता संघ : **महात्मागांधी विद्यामंदिर, वांद्रे**

उपविजेता संघ : **चोगले हायस्कूल, बोरिवली.**

**कबड्डी (मुली)**

विजेता संघ : **उत्कर्ष मंदिर, मालाड.**

उपविजेता संघ : **महात्मा गांधी विद्यामंदिर वांद्रे**

**खो-खो-(मुले)**

विजेता संघ : **नंदादीप विद्यालय, गोरेगाव.**

उपविजेता संघ : **पार्लेटिळक विद्यालय विलेपार्ले**

**खो-खो (मुली)**

विजेता संघ : **परांजपे विद्यालय, अंधेरी**

उपविजेता संघ : **आय्. ई. एस. न्यु इंग्लिश स्कूल वांद्रे.**

**ॲथलेटिक्स स्पर्धा :**

विजेता संघ : **माणेकजी कुपर एज्युकेशन ट्रस्ट हायस्कूल जुहू.**

उपविजेता संघ : **सेन्ट ॲन्स हायस्कूल मालाड**

**लोकनृत्य स्पर्धा :**

विजेता संघ : **चिल्ड्रेन्स वेलफेअर सेन्टर सेकंडरी स्कूल, अंधेरी.**

उपविजेता संघ : **विद्याविकास मंडळ विद्यालय, अंधेरी.**

**संचलन स्पर्धा :**

विजेता संघ : **सेन्ट थॉमस ॲकेडमी, गोरेगाव.**

उपविजेता संघ : **मेरी इम्याक्युलेट गर्ल्स हायस्कूल बोरीवली.**

शालांत परीक्षा व्याख्यानमाला (वर्ष-१७वे)

इयत्ता दहावीच्या विद्यार्थांना अत्यंत उपयुक्त ठरलेली अशी ही मार्गदर्शनपर व्याख्यानमाला प्रत्येक विषयातील तज्ञ शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली फेब्रुवारी १९८९ च्या दरम्यान नंदादीप विद्यालयाचे पटांगण गोरेगाव (पूर्व) या ठिकाणी आयोजित करण्यात आली होती. अत्यंत शिस्तबध्द वातावरणात पार पडलेल्या या व्याख्यानमालेचा लाभ हजारो विद्यार्थ्यांनी घेतला.

**धन्यवाद :**

संस्थेच्या प्रत्येक कार्यात हितचिंतकांचा सभासदांचा व संस्थेचे खरेखुरे बलस्थान असलेल्या सेवाभावी कार्यकर्त्यांचा सिंहाचा वाटा आहे. संस्थेच्या प्रत्येक कार्यात तत्परतेने मदत करण्यास पुढे येणाऱ्या अनेक मान्यवरांच्या व रिलायन्स उद्योगसमूह गोरेगाव स्पोर्टस क्लब या सारख्या संस्थांच्या पाठिंब्यामुळे व सक्रीय सहाय्य व सहकार्यामुळेच संस्थेस सामाजिक शैक्षणिक व क्रीडाक्षेत्रांत भरीव कामगिरी करता आली. त्या सर्वांची संस्था सदैव ऋणी राहिल त्याचप्रमाणे पत्रकारमित्र व इतर सेवाभावी संस्था ह्यांनी केलेल्या सक्रीय सहकार्यांचा आवर्जुन उल्लेख केला पाहिजे संस्थेचे सरकारमान्य हिशोब तपासनीस मेसर्स एस एस नायक आणि कंपनी यांनी केलेल्या बहुमोल मार्गदर्शन व सहकार्याबद्दल संस्था त्यांची अत्यंत ऋणी आहे. संस्थेच्या यापुढील वाटचालीतही सर्वांचा लोभ व प्रेम तसेच कायम राहिल असा विश्वास व्यक्त करीत आहोत.

आपले नम्र,

**कार्यकारी मंडळ (१९८७ ८९)**

प्रबोधन गोरेगाव

# प्रबोधन गोरेगाव

संस्था नोंदणी कायदा १८६० अन्वये नोंदलेली संस्था [Regn. No. Bom. 46/72 GB BSD]
मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० अन्वये नोंदलेली संस्था [Regn. No. F 2502 Bom ]

(१९८७-८९)


अध्यक्ष : आमदार *श्री. निळकंठ ज. सावंत*

उपाध्यक्ष : *श्री. प्रभाकर मोडक* डी. एम् ओ डी.ओ.ओ.

*श्री. विजय नाडकर्णी* बी. इ. (ऑ.)सिव्हील

-: कार्यकारी मंडळ :-

कार्याध्यक्ष : *श्री. गिरीश देसाई* डी.सी.ई.

प्रमुख कार्यवाह : *डॉ. मनोहर अदवानकर* एम् एस्सी. पीन्. डी,

सहकार्यवाह : *श्री. सुरेश चव्हाण* बी.ए.

: *श्री. श्रीनिवास शिरसेकर* जी.डी.आर्ट

खजिनदार : *श्री. महादेव खानोलकर*

-: सभासद :-

*श्री. सुभाष देसाई*

*श्री. वसंत तावडे* बी.ए.

*श्री. दिनकर मालवणकर*

*श्री. पदमाकर देसाई* बी.एस्सी.(ऑ)

*श्री. विलास देवरुखकर* बी.एस्सी.

*श्री. सुरेश सैतवडेकर*

*श्री. दिलीप साळवी* बी. एस्सी.(ऑ)

*श्री. विकास रेळे* बी. ए. एलएल.बी.

*श्री नितीन शिंदे*

*श्री. चंद्रकांत पोतदार*

*श्री. चंद्रकांत देऊळकर*


सनदी लेखापाल

*मे. एस. एस. नायक आणि कं*


*कार्यालय :*

३, प्रेमबिंदु स्वा. वि. मार्ग

गोरेगाव (प),

मुंबई–४०० ०६२

*संपर्क :*

**रंगसेवा**

फिल्मिस्तान जवळ, स्वा. वि. मार्ग

गोरेगाव [प] मुंबई-४०० ०६२

दूरध्वनी : ६७२ ४१ ५७